
VOL. 3 | ISSUE 6 | DECEMBER 2017
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 3.012(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL



*Chief Editor*
**Dr. Kalyan Gangarde**

VOL. 3 | ISSUE 6 | DECEMBER 2017

Impact Factor: 3.012 (IIJIF)

ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES (CHCS)

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

(UGC Approved Journal No. 63716)

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies

*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade**
Asst. Prof., Birla College, Kalyan (W)

***Co-editors***
Dr. Sadhana Agrawal (Gwalior)
Pandurang Barkale (Mumbai)
Dashrath Kamble (Kalyan)
Bharat Gugane (Nashik)

**MGEW SOCIETY'S**
**CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES**
**KALYAN (MAHARASHTRA)**
**Contact:** +91 9420079975 +91 9869530720 chcskalyan@gmail.com

**Full Journal Title:** Chronicle of Humanities & Cultural Studies(CHCS)
**Print ISSN:** 2454-5503
**UGC Approved Journal No. 63716**
**Impact Factor:** 3.012 (IIJIF)
**Frequency:** Bimonthly / **Language:** Multi language / **Journal Country/Territory:** India
**Publisher:** Centre for Humanities & cultural Studies, A-102, Sanghavi Regency, Sahyadrinagar, Kalyan (W) (MS).
**Subject Categories:** Humanities & Cultural Studies

*Chief Editor*
**Dr Kalyan Gangarde**
Director, Centre for Humanities and Cultural Studies, Kalyan (W)
*Executive Editor*
**Dr Grishma Khobragade,** Asst. Prof., Birla College, Kalyan (W)
*Co- editors*
**Dr. Sadhana Agrawal,** Asst. Professor, Maharani Laxmibai Govt. College of Excellence, Gwalior (M.P.) India
**Pandurang Barkale,** Asst. Professor, Dept of English, SNDT Women's University, Churchgate, Mumbai
**Bharat Gugane,** Asst. Professor, Bhosala Military College, Nashik, Maharashtra
**Dashrath Kamble,** Asst. Professor, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra
**Sachin Bhumbe,** Asst. Professor, P. N. Doshi College, Ghatkopar, Mumbai

## EDITORIAL ADVISORY BOARD

**Aju Mukhopadhyay,**
a poet, author and critic, 8 Cheir Lodi Street, Pondicherry, India.
Email: ajum24@gmail.com
**Dr R.T. Bedre,**
Principal RSPMS' SPP College, Sirsala, Dist. Beed (MS)
**Dr (Mrs.) Smita R. Nagori,**
Head,PG Department of English, M.U.College Udgir, Dist. Latur, Maharashtra, India. Email: smita.lakhotiya@gmail.com
**Dr Arvind Nawale**
Head, Department of English, Shivaji Mahavidyalaya Udgir, Dist. Latur (Member, BoS in English, Former Member of the Senate, Faculty of Arts, SRTM University, Nanded amnawale@gmail.com
**Dr Kailash Nimbalkar,**
Principal, S.B.College, Shahapur, Dist. Thane, Maharashtra, India. Email: nimbalkar_8@rediffmail.com.
**Tsai-ching Yeh**
Assistant professor, Department of English, National Taipei University of Technology. (Taivan)
**Dr B. N. Gaikwad,**
Vice Principal, N.G. Acharya and D.K. Marathe College of Arts, Commerce and Science , Chembur (East), Mumbai-400071
**Dr Simon Philip,**
Assistant professor, Department of Social Work, Voorhees College, Vellore
**Dr Binu Anitha Josheph**
Assistant professor, Department of English, Voorhees College, Vellore
**Dr Chandrashekhar Kanase**
Head, Department of Dramatics, SPP College, Sirsala, Dist Beed (MS)

## EDITORIAL BOARD

**Dr.Mahendra Shinde,** Associate Professor and Head, Department of English, N.M. Sailu, Dist. Parbhani, Maharashtra, India.
**Ram Bhise,** Assistant Professor, Saraswati College of Engineering, Kharghar, Navi Mumbai Maharashtra,India.
**Dr Asish Gupta,** Asst. Professor, J. H. Govt. P. G. College, Betul MP.

| Subscription Rates | | |
|---|---|---|
| | Annual membership (Individual) | Rs. 1,800 (150 $ for foreigners) ( Six Issues ) |
| | Bi-annual Membership | Rs. 3,500 (250 $ for foreigners) |
| | Institutional annual membership | Rs. 2,200 |
| | Institutional Bi-annual membership | Rs. 4,200 |

*Those interested in making online transactions, the following details may be of use:*

| Bank Name | Account Name | Account Number | IFSC code |
|---|---|---|---|
| Canara Bank **(Branch: New Marine Lines, Mumbai)** | Centre for Humanities & Cultural Studies | 1389101071921 | CNRB0001389 |

*DISCLAIMER: Academic facts, views and opinions published by authors in the Journal express solely the opinions of the respective authors. Authors are responsible for their content, citation of sources and the accuracy of their references and biographies/references. The editorial board or Editor in chief cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights.*

**Chronicle of Humanities and Cultural Studies**
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

# CONTENTS

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | History and Future of CALL: A 21st Century Perspective | Dr. R. S. Nitonde | 05 |
| 2. | A Matter of Time: A Feministic Discourse | Dr. Shaikh M A Raheman | 09 |
| 3. | Feministic Approach in Castillo's *So Far from God* | Arpana Gaur | 13 |
| 4. | Comprehending the Principles of Secularism in the Contermporary Indian & Indian Subcontinent Literature | Dr. Baliram Gaikwad | 16 |
| 5. | Gidugu: The Patron of Savara Language | Dr.N. Bhanusree | 20 |
| 6. | Entrapment,Conflict and hunger for freedom in Anita Desai's *Voices in the City*: A feminist Reading. | Pranami Bania | 26 |
| 7. | Diasporic Experiences in Jhumpa Lahiri's .... | Dr Pandit B Nirmal | 32 |
| 8. | *Sairat*: Art for Art's Sake or Art for Life's Sake | Dr Subhash K. Shinde, Mr Kishor N. Ingol | 37 |
| 9. | Emotional Rift in Relationships and Alienation ... | Dr. Ram Lakhan Dhakar | 42 |
| 10. | Adaptation Of Shakespeare's *Othello* In Bollywood | Anurag Pandey | 46 |
| 11. | Gender Audit: A Step towards Achieving Gender Equality | Jayeeta Datta | 50 |
| 12. | Growing Mall Culture in India - Changing Life Style | Dr. V. S. Kshirsagar | 55 |
| 13. | Socio-Political Concerns in Arundhati Roy's *Public Power in the Age of Empire* | Mrs. Usha | 58 |
| 14. | Unified Elections In India: A Critique | Dr. Rohini Waware, Adv. Swapnil Waware | 61 |
| 15. | The poetic Hurt and the Violence of the External World.... | Dr. Manpreet Kaur | 65 |
| 16. | Role of Foreign Direct Investment (FDI) In Banking Sector | Syed Vazeer Sayed Isa | 71 |
| 17. | Coalition Government in Maharashtra – Historical Review | Dr. P. S. Lokhande | 74 |
| 18. | Repercussions of Gandhian Ideology in Bhabani Bhattacharya's... | Dr Ramakant D. Mundhe | 76 |
| 19. | जागतिकीकरणचा भारतीय ग्रामीण सामाजिक जीवनावरील प्रभाव | प्रा.कल्पना एस.गोडघाटे | 80 |
| 20. | दक्षिण के प्रसिद्ध हिन्दी सेवी आचार्य जी. सुंदर रेड्डी | डॉ.ए. सन्यासि राव | 84 |
| 21. | गांधी दर्शन की प्रासंगिकता वर्तमान राजनीतिक और ... | डॉ.श्रीमती कल्पना वैश्य | 87 |
| 22. | कुमारविजयम् में वर्णित प्रकृति चित्रण | नरोत्तम | 91 |
| 23. | डॉ.मु.ब.शहा के निबन्धों में पत्रकारिता | डॉ.लावणे विजय भास्कर | 94 |
| 24. | ममता कालिया के कथा साहित्य में व्यक्त समस्याएँ | प्रा. नागराज उत्तमराव मुळे | 98 |
| 25. | इक्कीसवीं सदी के उपन्यासों में कृषक जीवन | डॉ. सुधीर गणेशराव वाघ | 101 |
| 26. | चर्मकार समाजातील गटई कामगारांच्या आर्थिक परिस्थितींचे समाजशास्त्रीय अध्ययन (संदर्भ : अमरावतीजिल्हा) | डॉ. सुभाष किशनराव पवार | 104 |
| 27. | ई-संसाधने आणि शोधतंत्रे | आर.बी.टेकाळे, डॉ. दया बी.दळवे-पाटील | 108 |
| 28. | जागतिकीकरणाचा कुटुंब संस्थेवरील परिणाम | डॉ. अश्रु पुंजाजी जाधव | 113 |
| 29. | ऐतीहासीक धार्मिक परंपरांची मानसीक चिकीत्सा | प्रा.डॉ.मोहन मिसाळ | 116 |
| 30. | यशवंतराव चव्हाण यांचे प्रशासकीय विचार | प्रा.डॉ.एम.एफ.राऊतराहे | 120 |
| 31. | क्रीडा संस्कृती आणि माध्यमांची भूमिका | प्रा.सुभाष रामकृष्ण गुंडवार | 122 |
| 32. | जागतिकीकरण आणि भारतीय शेती | प्रा. एन. आर. भिंगारे | 125 |
| 33. | जागतिकीकरणाचे ग्रामीण जीवनावर झालेले परिणाम .... | प्रा.डॉ.तंगलवाड दत्ता मा. | 128 |
| 34. | उच्च शिक्षा में पुस्तकालय पेशेवरों के मुद्दों और चुनौतियों | डॉ. योगेश कुमार अत्री, जयश्री माणिकराव गिते | 132 |
| 35. | साकेत और मौलिक उद्भावनायें | लता पाठक | 135 |
| 36. | महिलाओं के उत्थान में डॉ. अम्बेडकर का योगदान | डॉ. विभा वासुदेव | 137 |
| 37. | समाजिक आन्दोलन एवं उसका प्रभाव (भारत के संदर्भ में ) | श्याम पाठक | 141 |
| 38 | Contradictory Teetotalism and Postmodernism in ... | Dr. Mahesh Kumar Kushwah | 145 |

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

26.

# चर्मकार समाजातील गटई कामगांराच्या आर्थिक परिस्थितींचे समाजशास्त्रीय अध्ययन (संदर्भ : अमरावतीजिल्हा)

प्रा. डॉ. सुभाष किशनराव पवार
स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय
नांदगाव पेठ, जि. अमरावती

## प्रस्तावना :

विदर्भातील अमरावती जिल्ह्यात चर्मकार समाज साधारणपणे इतर जिल्ह्याच्या तुलनेत अधिक संख्येने वसलेला आहे. चर्मकार समाज हा बारा बलुतेदारापैकी एक आहे. गावगाडयातील इतर बलुतेदाराप्रमाणे चर्मकार समाजाला एक स्वतंत्र पारंपारीक धंदा आहे. विशेषतः शेतक-यांच्या शेती व्यवसायाला उपयुक्त असणारी चामडयाची अवजारे तसेच चप्पल, जोडे, बुट, बैलाच्या गळ्यातील पट्टे आणि मोठ तयार करुन देण्याची कामे त्याकाळी चर्मकार समाजाची असत. मोबदला म्हणून त्यांना धान्य मिळत असे. चर्मकार हिंदू धर्मामध्ये अस्पृश्य असला तरी गावगाडयातील इतर अस्पृश्य समाजापेक्षा उच्च दर्जाचा आहे. कारण गावातील पाटील, प्रमुख व्यक्ति यांच्या चप्पला, बुट जोडे तयार करण्यासाठी त्यांच्या जागी पायाची मापे घ्यावी लागत असे. त्यामूळे त्यांच्या पायाना स्पर्श करण्याची संधी फक्त चर्मकारांना मिळाल्यामूळे इतर अस्पृश्याच्या तूलनेत चर्मकारांना अस्पृश्यता कमी होती. चर्मकारंच्या पोटजातीत उच्च निच भेदभाव आहे. चर्मकार समाजात तीन पंथ पहावयास मिळतात. हरळे वैष्णव, रोहिदासी आणि लिंगायत.

## विषय निवड :

स्वातंत्र्योत्तर काळत भारत सरकारने सर्वाना न्याय मिळावा, सर्वाचा विकास व्हावा, सर्वाना समान संधी मिळवी, शिक्षणाची दारे सर्वाना खुली असावी असे धोरण स्विकारले आहे. चर्मकार समाजाचा विकास व्हावा या उद्देशाने त्यांच्या विकासासाठी शासनामार्फत काही योजना आखण्यात आल्या, काही आर्थिक सवलती देण्यात आल्या या सवलतीचा कितपत फायदा झाला व या सर्व घडामोडीचा चर्मकार समाजातील गटई कामगारावर त्याचा कोणता परिणाम झाला व त्यांचे कोणते प्रश्न सुटले व कोणते निर्माण झाले हे जाणून घेण्याच्या उद्देशाने , 'चर्मकार समाजातील गटई कामगाराच्या आर्थिक परिस्थितींचे समाजशास्त्रीय अध्ययन' (विशेष संदर्भ अमरावती जिल्हा) या विषयाची निवड लघु शोधनिबंधासाठी करण्यात आली आहे.

## संशोधन पध्दती :

सदरील लघु शोधनिबंधासाठी संशोधन पध्दतीतील प्रथम व द्वितीयक सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रथम सामग्रीअंतर्गत मुलाखत अनुसूचीचा वापर करुन तथ्यसंकलन करण्यात

आला आहे. तसेच विविध ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे व साप्ताहिक इत्यादी साहित्याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले आहे. तथ्य संकलनाच्या आधारे निष्कर्ष स्पष्ट करण्यात आले आहे.

### लघु शोधनिबंधाची उद्दिष्टये

१. चर्मकार समाजातील गटई कामगारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
२. शासनाच्या विविध योजनाचा गटई कामगारांना कितपत लाभ झाला या विषयीचे अध्ययन करणे.
३. गटई कामगारांच्या राजकिय जागृकतेचा अभ्यास करणे.
४. गटई कामगारांच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे

### अध्ययनाची व्याप्ती :

प्रस्तूत लघुशोध निबंधाची व्याप्ती अमरावती शहरापुरतीच मर्यादीत राहणार आहे. गटई कामगारांचा पारंपारीक व्यवसाय, व्यवसायाची गतिशिलता, परीवर्तनाचा वेग आणि आधुनिकतेचा प्रभाव या संदर्भात अध्ययन करण्यात येत आहे.

### गटई कामगारांची आर्थिक परिस्थतीः

स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचा प्रसार जसा होत गेला आणि नवनवीन उद्योगधंदे करण्याची संधी मिळाली तशीतशी जातीच्या पारंपारीक मुल्यांना काही प्रमाणात उतरती कळा लागली आहे. बाटा, पॅरागॉन या सारखे मोठमोठे चर्मउद्योगांचे कारखाने निर्माण झाल्याने खेडयापाडयातील या समाजातील लोकांनी शेतीचा व्यवसाय सुरु केला. तर काही लोक नोकरी व धंदयाच्या निमित्ताने शहरात येवून स्थायिक झाले. त्यांनी आपले स्वतंत्र व्यवसाय सुरु केले ता काही दुकानदारीकडे वळले आहे. दुकानदारीशिवाय रस्त्याच्या कडेला बसून चप्पल, बुट दुरस्तीचे काम करणा-यांना गटई कामगार म्हणून ओळखले जातात. या कामासाठी वापरल्या जाणा-या प्रमुख हत्यारांना रापी, आरा, हस्ती, परांडी आणि आबंर अशी नावे आहेत. गटई काम करणा-यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. असे किरकोळ काम करणारे लोक शहरातील विविध भागातील झोपडपट्टीत राहत असतात. या लोकांमध्ये अधंश्रध्दा प्रचंड प्रमाणात आहे. या समाजातील काही महिला चर्मकामासाठी पुरुषांना मदत करित असतात, त्याशिवाय काही मंडईतून भाजीपाला आणून रस्त्याच्या कडेला बसुन विक्रीचा धंदा करतात. तर काही या समाजातील बेकार तरुण चर्मकार दुकानदाराच्या दुकानात नौकरी करतात. तर काही रिक्षा ट्रक चालविण्याचा व्यवसाय करतात. मागासवर्गीयांना मिळणा-या आर्थिक सवलतीचा फायदा काही लोकांना मिळला आहे. मागासर्गीय विकास महामंडळतर्फे काही तरुणांनी मदत घेवून स्वतःच्या मालकीच्या रिक्षा घेतल्याचे आढळले. तसेच स्वतंत्र धंदयासाठी तर काहींनी कर्ज घेतल्याचे सांगण्यात आले. पारंपारीक चर्मकार व्यवसायाबरोबरच विविध शाखेचे उच्च शिक्षण घेण्याकडे तरुणांचा औढा अधिक असल्याचे जाणवते. शिपाया पासून ते अधिका-यापर्यंत या समाजातील लोक नोकरीत आहेत. सरकारी, निमसरकारी आणि केंद्र सरकारी कार्यालयात पाच टक्के लोक नाकरी करीत आहेत.

अमरावती शहरातील चर्मकार समाजात शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे. चर्मकार समाजातील तरणाचा डॉक्टर, अभियंता आणि प्राध्यापक होण्याकडे आहे. विशेष म्हणजे मागासवर्गीयांना मिळणा-या

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

सर्व सवलतींचा फायदा घेतांना हा समाज दिसतो. त्याचबरोबर पारंपारीक चर्मकारीतेच्या धंदयाबरोबरच शेती आणि शिक्षणाकडे या लोकांनी अधिक लक्ष पुरविल्याचचे पहावयास मिळते.

मनुष्य जीवन जगत असतांना कोणता तरी व्यवसाय करुन उत्पन्न मिळवत असतो. त्यावर स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. कुंटुबाचे राहणीमान त्यांच्या उत्पन्नावर अवलंबुन आहे. कुटुबांच्या उत्पन्नास त्या व्यक्तिचा दर्जा निश्चित होत असतो. चर्मकार समाजात शेती व्यवसाय, शेतीवर आधारीत इतर पारंपारीक व्यवसाय, नौकरी असेल तर कौटुबिक गरजा भागवून व्यक्ति बचत सुध्दा करित असतो. उत्पन्नाच्या आधारावरच व्यक्तिचा सामाजिक दर्जा निश्चित होत असतो.

**उत्तरदात्यांचा आर्थिक दर्जा दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | आर्थिक दर्जा | लिंग | | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | | स्त्री | पुरुष | | |
| १ | उच्च | ३० | ५० | ८० | २२.०९ |
| २ | अतिशय उच्च | १० | २० | ३० | ०९.२८ |
| ३ | निम्न | ५० | १२० | १७० | ४६.९६ |
| ४ | अतिशय निम्न | ३० | ५२ | ८२ | २२.६२ |
| ५ | एकुण | १२० | २४२ | ३६२ | १००.०० |

वरील सारणीवरुन असे स्पष्ट होते की, बहुतांश उत्तरदात्यांचे आर्थिक दर्जा हा निम्न स्वरुपाचा आहे. त्यांचे एकुण शेकडा प्रमाण ४६.९६ टक्के इतके पहावयास मिळते. तसेच अतिशय निम्न या गटातील दर्जा २२.६२ टक्के इतके आहे. उच्च दर्जा २२.०९ टक्के इतके आहे. आणि अतिशय उच्च हा ९.२८ टक्के इतके आहे. म्हणजे चर्मकार समाजातील आर्थिक दर्जा हा निम्न स्वरुपाचा आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात हा समाज राजकारणात मोठया संख्येने पहावयास मिळतो. राजकारणात चर्मकार समाजाला प्रतिनिधित्व मिळलेले आहे. मात्र चर्मकार समाजाला एकत्र बांधू शकेल असे समर्थ नेतृत्व अद्याप या समाजातून निर्माण होवू शकले नाही.

पारंपारीक व्यवसाय करणारा हा समाज सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीपासून अलिप्त असल्याचे पहावयास मिळते. सामाजिक अन्याय अत्याचाराच्या संबंधी संघर्षात्क भुमिका न घेता आहे त्याच परिस्थितीत मिळते जूळते घेण्याकडेच बहुतेक लोकांचा कल असतो. त्यामूळे या समाजात नाव घेण्यासारखी सामाजिक अथवा राजकिय संघटना पहावायास मिळत नाही. सामाजिक कार्यकत्यांचा या समाजात अभाव जाणवतो. विशेषतः चर्मकार तरुणामध्ये सामाजिक व राजकिय चळवळीच्या बाबतीत उदासीनता पहावयास मिळते. तरुण वर्ग सामाजिक कार्यात भाग घेतांना आढळत नाही. चर्मकार समाजा अंतर्गत सामाजिक जाणिवेने जे काही थोडेफार लोक काम करतात त्यात शिक्षकी पेशातील लोकांचा भरणा अधिक आहे.

बदलत्या काळानुसार बदलण्याची प्रक्रिया चर्मकार समाजात आत पहावयास मिळते. महाराष्ट्रात सुरु असलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचा परिणाम या समाजातील काही तरुणांवर जाणवू

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

लागला आहे. जातीच्या पारंपारीक धंदयामुळे आर्थिक स्थिती बरी असली तरी जातीचे सामाजिक स्थान बदललेले नाही.

## संदर्भसूची:

१. डॉ. केतकर श्री. व्य. महाराष्ट्रीय ज्ञानकोष, खंड १४, महाराष्ट्र ज्ञानकोष मंडळ, लि. नागपुर, शनिवार पेठ, पुणे.
२. गर्गे स. मा. , भारतीय समाजविज्ञान कोष, खंड २, समाजविज्ञान मंडळ, शिवाजी नगर पुणे.
३. चव्हाण रामनाथ नाकदेव, जाती आणि जमाती, मेहता पब्लिकेशन हाउस, सदाशिव पेठ, पुणे. पहिली आवृत्ती मार्च १९८९
४. बांदीवडेकर/ सहस्त्रबुध्दे, विश्व चर्मकारांचे, ग्रथांली प्रकाशन, मुबई
५. श्री. दुतोडे राम, रापी जेव्हा लेखणी बनते., सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
६. प्रदिप आगलावे, सामाजिक संशोधन पध्दती, साईनाथ प्रकाशन, नागपुरख २००७

०००